दिनांक १८/०७/२०१६

# प्रेस नोट

## लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा मंगरुळ येथील बँक चोरीतील तिन आरोपींना अटक करुन तिन लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १९/०६/२०१६ रोजीचे रात्री मंगरुळ ता.औसा जि.लातूर येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शटरचे आज्ञात चोरटयानी कुलुप तोडुन बँकेचे तिजोरी मधील रोख रक्कम ६,७३,३९८/- रु.तिजोरीसह चोरुन नेले बाबत पोलीस स्टशेन किल्लारी गुरनं.१०७/२०१६ कलम ४५७,३८० भादवि. प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता.

सदर गुन्हयाचा तपासासाठी मा.पोलीस अधीक्षक श्री. शिवाजी राठोड यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखा लातूर येथील दोन पथक नियुक्त करण्यात आले होते. सदर गुन्हयाच्या तपासात पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी गोपनिय माहिती काढुन आरोपी क्र.१) शंकर बाबु पुरी, वय ३६ वर्ष, टाटा सुमो मालक २) अमिन ऊर्फ मैनोद्दीन चाँद शहा, वय २३ वर्ष, धंदा- ड्रायव्हर ३) राशेद ऊर्फ लालु खादरअली शहा, वय ३० वर्ष, सर्व रा. भोसगा ता.लोहारा जि.उस्मानाबाद यांना दिनांक १७/०७/२०१६ ताब्यात घेवुन विचारपुस केली असता सदर आरोपीतांनी मंगरुळ येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शटरचे कुलुप तोडुन बँकेतील रोख रक्कम ६,७३,३९८/- रु.तिजोरीसह चोरुन नेले बाबत कबुली दिली आहे. सदर गुन्हयातील आरोपी क्र.२ अमिन ऊर्फ मैनोद्दीन चाँद शहा याचे कडुन रोख १,००,०००/-रुपये व तिजोरी कट करण्यासाठी वापरण्यात आलेली कटर मशीन ( किंमत १५००/-रु ) तसचे गुन्हया करण्या करीता वापरण्यात करण्यात आलेले वाहन टाटा सुमो जिप क्र.एम.एच.२४सी-४०७० ( किंमत २,००,०००/-रु ) असा एकुण ३,०१,५००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपींकडुन अधीक माहिती घेतली असा त्यांनी सांगीतलेली आरोपी शंकर पुरी याचा मित्र शब्बरी शहा रा. भोसगा यांच्या मेहुन्याची जमीन तळणी ता. औसा येथे असल्याने जमीन मोजणी करण्यासाठी टाटा सुमो भाडयाने घेवुन जायचे आहे. त्यामुळे गुन्हयातील सर्व आरोपी व शब्बीर शहा जमीन मोजुन गावी परत जात असताना मंगरुळ येथील बॅकेसमोरील किराणा दुकान जवळ थांबले असता आरोपी पुरी यांनी बँकेतील पिकविमा घेण्यासाठीची लोकांची गर्दी पाहुन बँकेत खुप पैसे आहेत असे वाटल्याने बँक लुटण्याचा कट रचुन दोन दिवस सदर ठिकाणाची टेहळणी केली व १९/६/२०१६ रोजी प्रत्यक्षात बँक लुटली.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता मा.पोलीस अधीक्षक श्री.शिवाजी राठोड व मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. लता फड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालाजी सोनटक्के , सपोनि.आर.एस.पडवळ, सपोनि. कैलास डाबेराव, सपोउपनि.लक्ष्मण कोमवाड, पोना. राम गवारे, युसुफ शेख, राजेंद्र टेकाळे, नामदेव पाटील, प्रदिप स्वामी, चापोना.नागनाथ जांभळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, लातूर अथक परिश्रम घेतले व सायबर सेलचे पोना.राजेश कंचे व रियाज सौदागर यांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी महत्वपुर्ण भुमिका बजावली आहे. सर्व टिमचे पोलीस अधीक्षक यांनी अभिनंदन केले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि.श्री.आर.एस.पडवळ हे करीत आहेत.